## वार्ता टिपण दि.११/०६/२०१९

**वानवडी पोस्टेचे हददीत बेकायदेशिर गांजा विक्री करणारे विरूध्द  गुन्हे शाखेचे खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाने टाकनेऱ्या छाप्यात १ किलो गांजा जप्त.**

दि.१०/०६/०२०१९ रोजी वानवडी पोस्टेचे हददीत रामटेकडी जंक्शन चौकाजवळ पेट्रोलिंग दरम्यान खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोहिते यांना मिळालेल्या माहितीनुसार,स्टाफसह इसम नामे  आकाश पोपट कांबळे वय २७ वर्ष व्यवसाय रिक्षाचालक रा. प्रथमा बिल्डींग,रूम नंबर २०५, दुसरा मजला, स.नं.११०, रामटेकडी पुणे यास पकडुन,त्याचे ताब्यातुन किं.रू.१५,१००/- रूपयांचा १ किलो १०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे.सदरचा गांजा हा इसम नामे लॉरेन्स पिल्ले् रा. रामटेकडी हडपसर पुणे याने दिला असलेचे सांगितले आहे.त्याबाबत त्यांचेविरूध्द वानवडी पोस्टे पुणे येथे गु.र.नं.३३६/२०१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब) (ii) (ब ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.त्यात इसम नामे आकाश पोपट कांबळे यास अटक करण्यात आली आहे.

**वरील कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त, मा.श्री. अशोक मोराळे सो, पोलीस उप-आयुक्त श्री. शिरीष सरदेशपांडे सो., सहा.पोलीस आयुक्त श्री. समीर शेख सो, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र माहिते, पोलीस उप-निरीक्षक आनंद रावडे, निखील पवार,पोलीस कर्मचारी  उदय काळभोर,प्रकाश मगर, महेश कदम, मनोज शिंदे,रमेश गरूड,अमोल पिलाने, फिरोज बागवान,नारायण बनकर यांनी केलेली आहे.**